# वादळी पावसामुळे शहरामध्ये ३० झाडे कोसळली

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १६ :



शहरासह जिल्ह्यात वादळी पावसाचे थैमान सुरू असून रविवारी दुपारी २.३० वाजता झालेल्या एका तासाच्या वादळी पावसामुळे शहरात यंदाच्या मोसमात प्रथमच विविध ठिकाणी ३० झाडे कोसळली. ढगांचा गडगडाट, ४० ते ४५ किमी प्रतितास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह ४५ मिनिटे झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. बहुतेक ठिकाणी झाडे रस्त्यांवर पडल्यामुळे वाहतूक खोळंबली होती.

शहरात नंदा मोटर्स, नवाथे, राजापेठ, साईनगर, शारदा विहार, गोपालनगर, दरोगा प्लॉट, प्रसाद कॉलनी, नरहरी नगरात दोन ठिकाणी, दस्तूर नगर, मोतीनगर, फरशी स्टॉप, नारायणनगर शाळा, दिल्ली पब्लिक स्कूल, पत्रकार कॉलनी, नवाथे चौक व परिसर, हमालपुरा, कल्याण नगर, बालाजी नगर, खोलापुरी गेट, गणेश कॉलनी, प्रभात कॉलनी, पन्नालाल नगर या ठिकाणी झाडे कोसळली. त्याचप्रमाणे शहरात काही भागात झाडे कोसळली नसली तरी झाडाच्या फांद्या तुटून जमिनीवर पडल्यामुळे नागरिकांनीच त्या बाजूला करून वाहतुकीसाठी अंतर्गत रस्ते मोकळे केले.

शहरात नवाथे चौक व परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे कोसळली. एक झाड लागूनच असलेल्या रोहित्रावर कोसळल्याने येथील वीज पुरवठा खंडित झाला होता. तसेच काही झाडे रस्त्यावर तर काही झाडे घराच्या आवारात कोसळली. त्यामुळे मनपाच्या अग्निशमन विभागाचा फोन सतत खणखणत होता. रविवारी दुपारी राजापेठ भुयारी मार्गात साचलेले पाणी, तर वादळामुळे नवाथे परिसरात रोहित्रावर झाड कोसळले होते.

ढगांचा गडगडाट ऐकू येताच वीज पुरवठा खंडित महावितरण आम्ही कसे चांगले काम करत आहोत, याचा आव आणत असताना दुसरीकडे शहरवासी सततच्या खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. ढगांचा गडगडाट ऐकू आला तरी वीजपुरवठा खंडित करण्यात येत येतो. सध्या प्रचंड उकाडा वाढला असताना दिवसभरात किमान सहा ते सात वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक वैतागले आहेत.

# गतवर्षीचे १२ हजारांवर शेतकरी मदतीपासून वंचित

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १६ :

गत वर्षी खरीप हंगामात झालेल्या पीक नुकसानीची मदत अद्यापही सर्वच शेतकऱ्यांना मिळालेली नाही. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून ७९ कोटीची मदत जाहीर केली करण्यात आली होती. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार ५७ हजारांपैकी ४५ हजार याद्या अपलोड करण्यात आल्या असून १२ हजारांवर याद्या अपलोड करणे बाकी आहे. संबंधित शेतकऱ्यांची मदत थेट डीबीटीद्वारे खात्यात जमा होत आहे. त्या अनुषंगाने तहसील कार्यालयातून संबंधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड करण्याचे काम सुरू आहे. मात्र सध्या यंदाचा खरीप हंगाम सुरु झाला असून, सरकारी यंत्रणांनी तातडीने मदत देण्याची प्रक्रिया गतीमान पद्धतीने राबवावी, अशी मागणी होत आहे.



गतवर्षीच्या खरीप हंगामात कधी अवर्षण तर कधी अतिवृष्टीमुळे खरीप पिकांना फटका बसला होता. जून महिन्यात पहिले दहा दिवस पाऊस झाल्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात उघडीप होती. त्यानंतर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मात्र पावसाला पुन्हा प्रारंभ झाला. काही दिवसांचा अपवाद वगळल्यास रोज काही ठिकाणी पाऊस पडला होता. त्यानंतर ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात आतापर्यंत अनेकदा अतिवृष्टी झाली. १० पेक्षा जास्त मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा परिषद, कृषी व महसूल विभागाकडून संयुक्त पंचनामे करण्यात आले होते. त्यानंतर मदती निधीसाठीचा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला होता.

पेरणी तोंडावर तरी मदतीची प्रतीक्षा : नुकसानग्रस्त ४५ हजार शेतकऱ्यांच्या याद्या पोर्टलवर अपलोड करण्यात आल्या आहेत. त्यापैकी व्हीके नंबर प्राप्त झाल्यानंतरही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम अद्याप जमा झाली नाही.

खरिपाची पेरणी तोंडावर असताना गतवर्षीची पीक नुकसानीची मदत मात्र अद्यापही मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

असे झाले होते दोन महिन्यात नुकसान : गत खरीप हंगामात ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये अकोट, अकोला, बार्शीटाकळी, मूर्तिजापूर, बाळापूर, पातूर तालुक्यातील ५७ हजार ३८० हेक्टरवर क्षेत्र बाधित झाले होते. तसेच अकोट तालुक्यातील ७७ हेक्टरवर केळी, ८२ हेक्टरवर पानपिंपरी असे एकूण १५९ हेक्टरवर व लिंबू व सत्र्यांचे १८९.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते तर पातूर तालुक्यातील ३७ हेक्टरवर लिंबू व संत्रा पिकांनी हानी झाली होती. कृषि, महसूल व ग्रामविकास विभागाकडून संयुक्त पंचनामे करण्यात आले.

त्यानुसार ७९ कोटी ४८ लाख रुपये निधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्याला शासनाची मंजुरी मिळाली. मदतीसाठी पात्र शेतकऱ्यांची माहिती शासनाला सादर झाल्यानंतर व्हीके नंबर प्राप्त झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना सीएससी केंद्रांवर अंगठा द्यावा लागणार आहे.

# मोफत रोगनिदान, औषधोपचार व शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आरोग्य संकल्प अभियानाचा १ हजार ८४९ रुग्णांनी घेतला लाभ

■ महासागर प्रतिनिधी,
दारव्हा , दि. १६ :



मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे व माँ आरोग्य सेवा समिती यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १५ जूनला संपन्न झालेल्या आयोजित निशुल्क रोगनिदान शस्त्रक्रिया उपचार व औषधी वाटप शिबिराला भरघोस प्रतिसाद लाभला जवळपास १ हजार ८४९ रुग्णांनी लाभ घेतला.

हा कार्यक्रम सोहळा दारव्हा नगर परिषद उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रं २ शाळेच्या परिसरात आयोजित करण्यात आला होता. दारव्हा तालुक्यातील प्रत्येक गावागावात, शहरातील प्रभागात बाळासाहेबांच्या शिवसैनिकांनी रुग्णापर्यंत जाऊन त्यांना शिबिराची माहिती दिली तसेच शिबिराचे ठिकाणी पोस्टर्स लाऊन -दारोदारी जाऊन विविध आजारांच्या रुग्णांची नोंद करून घेतली. तपासणीनंतर जवळपास १८४८ रुग्णांच्या यशस्वी तपासण्या व रोगनिदान करण्यात आले. व रुग्णांना पुढील शस्त्रक्रिया व उपचारांकरिता निवडण्यात आले.

या रुग्णांना औषधीचा पुरेपूर लाभ मिळाल्यामुळे व चांगल्या दर्जाची तपासणी करून मिळाल्यामुळे आमदार संजय राठोड यांचे समस्त नागरिकांनी भरभरून कौतुक केले.

विशेष बाब म्हणजे या शिबिरात तपासणी केलेल्या भरती रुग्णांची बीपी -रक्त - लघवी -शुगर -ईसीजी २ डी इको -टीएमटी व महिलांच्या ब्रेस्ट कॅन्सर तपासणी तथा विविध आजाराच्या तपासण्या या महागड्या तपासण्या सुद्धा या शिबिरात निवड झालेल्या रुग्णाकरिता मोफत करण्यात येणार आहे. तपासणी झालेल्या सर्व आजारांतील ८१७ रुग्णांना पुढील उपचारांकरिता योग्य सल्ला व मार्गदर्शन करून त्यांना आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे येथे मोफत नेण्यात येणार आहे.

या शिबिराच्या यशस्वीते करिता बाळासाहेबांची शिवसेना, युवासेना , महिला आघाडी त्याचबरोबर ,विविध सामाजिक संघटना चैतन्य ग्रुप ऑफ स्पोर्ट ज्येष्ठनागरिक मंडळ , डॉक्टर असोसिएशन , मेडीकल असोसिएशन यांचे सहकार्य केले.

उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, ज्येष्ठ मार्गदर्शक जीवन पाटील, तालुकाप्रमुख मनोज सिंगी, शहर प्रमुख राजू दूधे, आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगीचे डॉ. राजेश सव्वालाखे, डॉ.प्रिया गोडे मुरलीधर उमाठे, डॉ. अभिषेक इंगोले, तालुका संघटिका पुष्पा ससाणे, प्रा. यशवंत पवार, ,कृउबासचे सभापती सुभाष राठोड, उपसभापती सुशांत इंगाल, योगेश गवळी , माजी सभापती सुनीता राऊत,माजी उपसभापती नामदेव जाधव,माजी नगराध्यक्ष बबनराव इरवे, यशवंत पवार, रमेश राठोड, माजी सभापती सुनीता राऊत, उपसभापती नामदेव जाधव आदींची उपस्थिती होती.

# महावितरण अभियंत्याच्या अंगावर टाकले पेट्रोल

## टेबल पेटवले : दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १६ :

आमच्याकडची लाईट राहत नाही, तुम्ही कार्यालयात बसून काय काम करता, आम्ही आता तुमचे कार्यालयच पेटवून देतो म्हणत दोघांनी महावितरणच्या वलगाव उपकेंद्रातील टेबलवर पेट्रोल ओतून पेटवून दिले. यावेळी उपस्थित अभियंता या घटनेचा मोबाइलवर व्हिडीओ शूट करत असताना एकाने त्यांच्या अंगावरही पेट्रोल टाकले. मात्र अभियंत्याने जीव वाचवत बाहेर पळ काढला. ही घटना वलगाव येथे रविवारी (दि. १५) दुपारी १२ वाजता घडली. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.



अविनाश गोवर्धन निमर्ळ (३३) आणि विनीत दिलीप तायडे (३३, दोघेही रा. वलगाव) अशी आरोपींची नावे आहेत. वलगाव केंद्राचा अतिरिक्त कार्यभार असलेले कनिष्ठ अभियंता गोपाल विनायक इंगळे यांनी दिलेल्या पोलिस तक्रारीनुसार, अभियंता गोपाल इंगळे व त्यांचे सहकारी कार्यालयात हजर होते. त्यावेळी अविनाश व विनीत कार्यालयात आले. त्यांनी इंगळेंना म्हटले, की आमच्याकडील लाईट राहत नाही. तुम्ही कार्यालयात बसून काय काम करता. आता तुम्ही काहीही काम करायचे नाही. आम्ही आता तुमचे कार्यालय व तुम्हालाही पेटवून देतो. त्यावेळी अभियंता इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अविनाश व विनीतला समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी शिवीगाळ केली व बॉटलमधील पेट्रोल त्यांनी कार्यालयातील टेबलवर फेकण्यास सुरुवात केली. त्यावेळी कार्यालयातील उर्विरित. दोन्ही टेबलांवरील महत्वाच्या कागदपत्रांची झाली राख अविनाश व विनीत या दोघांनी सहायक अभियंत्याच्या कक्षातील टेबल तसेच बाहेर असलेला एक टेबल पेटवला. या दोन्ही टेबलवर महत्वाचे दस्तावेज होते. ते सर्व जळून खाक झाले आहेत.

# रोटरी क्लब ईस्टतर्फे १२ गरजू विद्यार्थ्यांना सायकली वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १६ : रोटरी क्लब ऑफ अकोला ईस्टच्या वतीने विद्यार्थिनींना नवीन सायकली, शिलाई मशीन, सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल मशीनचे वितरण करण्यात आले. बी. आर. हायस्कूल येथे आयोजित या शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रमाचा प्रारंभ रोटरी ईस्टच्या अध्यक्षा पूनम मुंदडा यांच्या अध्यक्षतेत, प्रमुख पाहुणे डॉ. जुगल चिराणिया यांच्या हस्ते व रोटरी ईस्टचे ॲड. सेक्रेटरी रमण राठी, प्रोजेक्ट सेक्रेटरी मनोज माळोदे तथा बी. आर. हायस्कूल माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष अजय सेंगर, प्रभारी मुख्याध्यापक खडसे,अहिल्या देवी कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका मायी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी बी. आर. हायस्कूल, भारत विद्यालय, माँ शारदा ज्ञानपीठ, हेडगेवार शाळा, प्राजक्ता कनिष्ठ महाविद्यालय, बाल शिवाजी शाळा, आदर्श विद्यालय, बालाजी विद्यामंदिर मधील गरजू विद्यार्थीनींना प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण १२ नवीन सायकलींचे वितरण केले. तसेच गरजू महिलांना प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ६ नवीन शिलाई मशीन, शहरातील ८ शाळा व मुलींच्या वसतिगृहात नवीन ११ सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल मशिनचे वितरण करण्यात आले. या मशिनसंबंधित शाळेत व मुलींच्या वसतिगृहात कंपनीचे तज्ज्ञ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन करून दिले. समाजातील गरजू लोकांपर्यंत पोहोचण्याचा नेहमीच रोटरी ईस्टचा प्रयत्न राहिला आहे. विविध साहित्याचे वितरण याच उद्देशातून करण्यात येते. दरवर्षी हा उपक्रम राबण्यात येतो. ज्या गरजूंना विविध साहित्यांचे वाटप झाले आहे, त्या सर्वांना रोटरी ईस्टच्या अध्यक्षा पूनम अशोक मुंदडा यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. जुगल चिराणीया यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन क्लबचे प्रोजेक्ट सेक्रेटरी मनोज माळोदे यांनी केले. यावेळी पंचशील चौधरी, डॉ. जे. डी. वाघेला, प्रकाश दाते, डॉ. रघुनाथ खडसे, अशोक अग्रवाल, संजय हेडा, सुनील साधवानी, काजल राजवैद्य, बी. आर. हायस्कूलच्या माजी विद्यार्थी संघाचे सचिव श्याम गोटफफोडे, महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

गरजू ६ महिलांच्या हाताला उपलब्ध करून दिला रोजगार महिलांना त्यांच्या पायावर उभे राहणे आवश्यक आहे.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **MOHAMMAD KALEEM.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD KALEEM ANSARI.** PASSPORT NO :- **N4477661** **ADD :** HOUSE NO 244 PANAI PETH NEAR RAHMAN MANZIL MOMINPURA NAGPUR 440018

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **N5677772**. MY OLD NAME WAS **SURESHKUMAR LAHORIMAL KHATRI.** NOW MY NEW NAME IS **SURESH LAHORIMAL KHATRI.** **ADD :** DESHNA NAGAR OPP NASHIKAR PLOT AMRAVATI 444606

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AA772894**. MY OLD NAME WAS **GOUTAM KUMAR MUNWARLAL DHINGRA.** NOW MY NEW NAME IS **GOUTAM MUNWARLAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 92, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AD312303**. MY OLD NAME WAS **PAYAL KUMARI @ PAYAL KUMARI DHINGRA.** NOW MY NEW NAME IS **PAYAL GOUTAM DHINGRA.** **ADD :** PLOT NO 92, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AB236621**. MY OLD NAME WAS **SONU KUMAR MUNWAR LAL DHINGRA.** NOW MY NEW NAME IS **SONU MUNWARLAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 92, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AA772895**. MY OLD NAME WAS **KUSSUM.** NOW MY NEW NAME IS **KUSSUM KAMAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 91, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AA772895**. MY OLD NAME WAS **KAMAL DHINGRA.** NOW MY NEW NAME IS **KAMAL MUKESHLAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 91, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AA772896**. MY OLD NAME WAS **MALA DHINGRA.** NOW MY NEW NAME IS **MALA MUKESHLAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 91, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AA772896**. MY OLD NAME WAS **MUKESHLAL BAADOMAL DINGRA.** NOW MY NEW NAME IS **MUKESHLAL BAADOMAL DHINGRA.** **ADD :** PLOT NO 91, SHRIRAM CHOWK, NETAJI NAGAR, PARDI, NAGPUR 440035

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AD312303**. MY OLD NAME WAS **PARKASH LAL.** NOW MY NEW NAME IS **PRAKASH LAL TALREJA.** **ADD :** 188 A, PARSHAVNATH NAGAR KESHAR BAG ROAD, INDORE 452009

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **AD312303**. MY OLD NAME WAS **SAPNA KUMARI.** NOW MY NEW NAME IS **SAPNA TALREJA.** **ADD :** 188 A, PARSHAVNATH NAGAR KESHAR BAG ROAD, INDORE 452009

MY OLD NAME WAS **DINESH ASHOKKUMAR CHADDA.** NOW MY NEW NAME IS **DINESH ASHOKKUMAR CHODDA.** **ADD :** PLOT NO. 97 RAM NAGAR GAROBA MAIDAN NAGPUR - 440008

MY OLD NAME WAS **AMEER KHAN SHEKH LAL.** NOW MY NEW NAME IS **AAMIR QURAISHI SHEKH LAL QURAISHI.** **ADD :** PLOT NO 76, NEAR WATER TANK, GUNDPURA, UPASE LAYOUT, KAMPTEE 441002

MY OLD PASSPORT NO **N5470706** IS MY INCORRECT NAME WAS **TAHER ALI BABJI.** NOW NEW CORRECT NAME IS **TAHER MUNAWWAR ALI BABJI.** **ADD:** BABJI VILLA, SINDHI CAMP, TANK ROAD, KHAMGAON DISTT. BULDHANA MS 444303

MY SON PASSPORT NO **N5470706** IS MY INCORRECT NAME WAS **MUNNAWAR ALI BABJI.** NOW NEW CORRECT NAME IS **MUNA-WWAR ALI SAIFUDDIN BABJI.** **ADD :-** BABJI VILLA,SINDHI CAMP, TANK ROAD, KHAMGAON DISTT. BULDHANA MS 444303



## नोटीस

Civil (B) No. 1614/2025

मुंबई येथील न्यायाधिकारी, उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठ, नागपूर.

हुकूमाची तारीख : २९/०४/२०२५

FIRST APPEAL NO. 1091 OF 2024
The Member, Motor Accident Claims Tribunal-3, Nagpur in (M.A.C.P. No. 694/2021)

Appellant :- TATA AIG General Insurance Co. Ltd., The Divisional Manager, Dharampeth, Nagpur.
--Versus --
Respondents :- Nalini Wd/o Shriram Pimpalkar and others.
To,
R. No. 4: Ranjana Dinkar Waikar, R/o. Dhamna Linga, Amravati Road, Nagpur.

सदरहू प्रतिवादी नं. ०४ यांना सुचित करण्यात येते की, वरील मुकदम्यातील The Member, Motor Accident Claims Tribunal-3, Nagpur in (M.A.C.P. No. 694/2021) यांचे हुकुमनाम्यावर सदरहू अपीलेंट (वरिलप्रमाणे) याने पहिले अपिल दिले असून ते कोर्टाच्या रजिस्टरात दाखल करण्यात आले आहे.

वरील नमूद केलेल्या पहिले अपिल अर्जाची चौकशी नोटीस प्रकाशित झाल्यापासून पाच आठवड्याच्या आत/लवकरात लवकर होईल, असा या कोर्टाने हुकूम केला आहे. तसेच वरील प्रकरणाची अंतिम सुनावणी का करण्यात येउ नये. यास्तव तुमच्यातर्फे अधिवक्ता किंवा मुकदमा चालविण्यास कायद्यानुसार ज्यास अधिकार आहे असा कोणी व्यक्ती सदरहू पहिले अपिल अर्ज चालविण्यास हजर झाला नाही तर तुमच्या परोक्ष एकतर्फे पहिले अपिल अर्जाची सुनावणी होऊन निकाल करण्यात येईल.

यास साक्ष SHRI ALOK ARADHE सदरहू मुंबई येथील मुख्य न्यायाधिकारी आज तारीख 29th April, 2025

SEAL

कोर्टाचे हुकूमाने,
(Smt. A.S. Kothale)
सहाय्यक प्रबंधक,
मुंबई उच्च न्यायालय,
नागपूर खंडपीठ नामपूर


# राजा लुंगे यांना राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. १६ : टाकरखेडा शंभू येथे नुकत्याच आयोजित राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार सन्मान सोहळ्यात युवा उद्योजक राजा लुंगे यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार बहाल करण्यात आला.

याप्रसंगी राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे, ग्रामगीताचार्य पौर्णिमा सवाई, संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जिजाऊ बँकेचे संचालक भैया निचळ, आयडियल ॲग्रो सर्च कंपनीचे वैभव जाधव, राजीव गांधी प्रतिष्ठानचे सदस्य राहुल तायडे, दीपक पाटील, गोपाल कडू आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

लुंगे यांनी शहरातील होणारे प्रदूषण, रोगराई रोखण्यासाठी व स्वच्छतेकरिता शहरातील दररोज निघणारा सहा ते सात टन ओला नारळ, कचरा यावर प्रक्रिया करून कोकोपीट, नारळदोरी व विविध प्रकारच्या वस्तू बनवण्याचा कृषिपूरक उद्योग अमरावती एमआयडीसी क्षेत्रात सुरू केला. हा एक रोजगारक्षम व्यवसाय असून, ही बाब तरुण शेतकरी पुत्रांसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे मत प्रकाश साबळे यांनी यावेळी व्यक्त केले. लुंगे यांना राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संजय राठोड यांच्या ताफ्यातील वाहन उलटले

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. १६ :



राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या ताफ्यातील वाहनाचा टायर फुटून वाहन उलटल्याने चार पोलिस जखमी झाले. अकोला- मूर्तिजापूर महामार्गावर शिवणी विमानतळाजवळ अपघात झाला. जखमींवर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या चारही पोलिस कर्मचाऱ्यांची प्रकृती स्थिर आहे. मंत्री राठोड यांना जामनेर येथील पुढील कार्यक्रमासाठी सोडून जामनेरहून परत यवतमाळकडे येत असताना रविवारी दुपारी पावणेचारच्या सुमारास हा अपघात झाला. अपघातात वाहन चालक अनिल ओंकार मडपांचे (४६), रा. यवतमाळ, फईम खान असलम खान (४०), रा. अमरावती, गौतम रमेश नाईक (३६), रा. नागपूर व प्रफुल्ल काशीनाथ वाळके (३८), रा. अकोट हे जखमी झाले. हे चौघेही एसपीयू (स्पेशल प्रोटेक्शन युनिट) नागपूर येथे नियुक्त आहेत. अपघाताची माहिती कळताच राठोड यांनी रात्री अकोला येथील रुग्णालयात धाव घेऊन जखमीची विचारपूस केली.


महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला

जावक कमांक ४७२१/ ईनिसु-४/ निलि / २०२५ / दिनांक ११.६.२०२५

email.akola.ee@mahapwd.gov.in | Phone No 0724-2435199

### ई-निविदा सुचना ४/२०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्या कडून सक्षम कत्राटदारा कडून खालील कामा करीता ब-१ नमुन्यातील काम क्रं. १ ते ९ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती याची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार निविदे स्पर्धमध्ये भाग घेवू शकेल. कंत्राटदारा कडून ब-१ नमुन्यातील ई निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधिन राहून निविदे मध्ये सहभाग नोंदवू शकतील, ई-निविदा संकेत स्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी, तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील क्रिडा संकुल बाळापूर येथे क्रिडा कार्यालय इमारत बांधणे ता. बाळापुर | ७१५६७८६ | पात्र |
| २ | अकोला जिल्हयातील आंबटाकळी वाडेगांव माझोड बार्शिटाकळी पिंजर रस्ता रामा-२७४ साखळी के. १३४/५०० मधील लहान पूलाची दुरुस्ती करणे ता. मुर्तिजापूर | ५२४५७११ | पात्र |
| ३ | अकोला जिल्हयातील मोजे कळंबी महागांव येथे हनुमान मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभामंडपाचे बांधकाम करणे ता. बाळापूर | १२४०३३८ | पात्र |
| ४ | एस.एल.आर. अंतर्गत बाळापूर सिव्हील कोर्ट इमारतीचे दरुस्ती करणे | ११९८३३६ | पात्र |
| ५ | एस.एल.आर.अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे मुलीचे वसतीगृहाची दुरुस्ती करणे | १६७८०४२ | सुबेअ |
| ६ | अकोला जिल्हयातील पिंजर येथे गजानन महाराज मंदीरा जवळ ग्रामपंचायत जागेत सभामंडप बांधणे ता. बार्शिटाकळी | १६५७७३१ | सुबेअ |
| ७ | अकोला जिल्हयातील मोजे येळवण येथे आदिवासी वस्तीमध्ये सामाजिक सभागृह बाधणे ता. अकोला | १५८७०४६ | मकाससं |
| ८ | अकोला जिल्हयातील गोरेगांव येथे अनुसूचित जाती मुलीचे शासकीय निवासी शाळेच्या आवारात बॉक्सींगचे ग्राऊंड बांधणे ता. अकोला | १६५१६४९ | मकाससं |
| ९ | अकोला जिल्हयातील मौजे जांब वसु येथे वसंत उंबरकर यांचे शेत ते बबन घुगे यांचे शेतापर्यंत सिमॅर कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे ता. बार्शिटाकळी | १६३३३७८ | मकाससं |

अटी व शती :-
१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२. ई-निविदा काम क्र.१ ते ९ कामांची ई-निविदा दिनांक १७/०६/२०२५ राजी १०.०० पासून दिनांक २४.०६.२०२५ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई निविदा कामाची ई-निविदा उघडण्याची दिनांक २६.०६.२०२५ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे )
३. वरील काम क्रं.१ ते ९ कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील.
४. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहिल. http://mahatenders.gov.in
५. ईतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्यांचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहे.
६. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावा व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही.
७. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील

स्वा/-
(प्रसाद पाटील)
कार्यकारी अभियंता
सा. बा. विभाग अकोला

DGIPR-2025-26/N0-5/C1180

## मागासवर्गीय मुलींसाठी मोताळा येथील वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**बुलडाणा (जिमाका):** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा जिल्हा अधिनस्त मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मोताळा येथील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही प्रवेश प्रक्रिया मागासवर्गीय प्रवर्गनिहाय आरक्षण टक्केवारीनुसार असेल. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग, अनाथ इत्यादी प्रवर्गातील मुलींना प्रवेशासाठी पात्रता दिली जाणार आहे. मोताळा नगर पंचायत हद्दीतील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालये येथे शिक्षण घेणाऱ्या आणि अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना अर्ज भरता येणार आहे.प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा असून, त्यासाठी https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करावा. यासंदर्भात वसतिगृहाचे गृहपाल अरुण इंगळे यांनी जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## थोडक्यात

### सोमनाथ मंदिरातील दिव्य ज्योतीर्लिंग दर्शनासाठी आज शहरात

**खामगाव (का.प्र.):** आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने सोमनाथ येथील दिव्य ज्योर्तिलिंग उद्या १७ जून २५ रोजी शहरात आणण्यात येत आहे. त्यानिमीत्ताने श्रीहरी लॉन्स येथे दुपारी ४.३० ते ५ वाजेपर्यंत सत्संग, ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत रुद्रपूजन व संध्याकाळी ६.३० ते रात्री ८.३० वाजेपर्यंत दर्शन कार्यक्रम होणार आहे. अधिक माहितीसाठी शरद पुरोहित मो. ९८२२६९९४७६, मिनाक्षी शेळके मो. ९६८९९१७३८९, भारती जवरे मो. ७३८७५०४०९९. प्रशांत जवरे मो. ९४०४६९३९५२, शितल पवार मो. ९९२३३९५०५३, लता जोशी मो. ९९७००७६४२५, अजय डवरे मो. ८८३०२७८१३९, अशोक पडघान मो. ८३२९१५७०४३, दिलीप खडसे मो. ९९२२१०३५३५, नम्रता भोकरे मो. ९५१८७४७६४६ व शेखर तोडकर मो. ७०३८२५८४५५ यांच्याशी संपर्क साधावा.

### मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह मलकापूर प्रवेश प्रक्रिया सुरू

**बुलडाणा,(जिमाका) :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलडाणा जिल्हा बुलडाणा अधिनस्त मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, मलकापूर जि.बुलडाणा येथील वसतिगृह प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता सरु करण्यात आलेली आहे. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार समाजातील, अनु.जाती, अनु जमाती, विमुक्त व भटक्या जाती, जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अपंग, अनाथ इत्यादी प्रवर्गातील विद्यार्थीनी प्रवेशास पात्र असतील. शालेय, कनिष्ठ, विद्यालयीन व महाविद्यालयीन मलकापूर येथील नगर परिषद हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालय मधील अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील प्रवेशीत विद्यार्थीनी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र राहतील.

प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. अर्ज भरण्याकरीता https://hmas.mahait.org या लिंकचा वापर करावा. याअनुषंगाने जास्तीत जास्त विद्यार्थीनींनी प्रवेश अर्ज भरावे. तसेच अधिक माहिती करीता ९४२३७६१४०३ वर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतीगृहाला भेट द्यावी, असे आवाहन वसतीगृहाचे गृहपाल अरुण इंगळे यांनी केले आहे.

### शेतात का आला? म्हणत काठीने मारहाण

**खामगाव (का.प्र.):** शेतात कसा आला असे म्हणत दोघांनी राजाराम रामचंद्र खडसे (५०) यांना काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना तालुक्यातील पिंप्राळा शिवारात घडली. याबाबत राजाराम रामचंद्र खडसे रा. गोपाळ नगर यांनी खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, काल १५ जून रोजी ते त्यांच्या पिंप्राळा शिवारातील शेतात मशागत करत असताना योगेश रवींद्र गर्गे व सौ. प्रीती गर्गे रा. महाराजा रेसिडेन्सी खामगाव हे तेथे आले व तू आमच्या शेतात कसा आला असे म्हणून त्यांनी वाद घातला आणि काठीने आणि दगडाने मारहाण करून जखमी केले तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी योगेश रवींद्र गर्गे व सौ. प्रीती गर्गे यांच्या विरुद्ध कलम ११८ (१), ३५२,३५१,३ (५) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### ढाब्यावर छापा; २४ हजारांची दारू जप्त

**खामगाव (का.प्र.):** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने



अकोला रोडवरील सुदर्शन ढाब्यावर छापा मारून अवैधरित्या विक्री करण्यासाठी ठेवण्यात आलेली दारू जप्त केली आहे. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे बुलडाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अकोला रोडवरील सुदर्शन ढाब्यावर छापा मारला. यावेळी याठिकाणी पोलिसांना वेगवेळ्या प्रकाराची विदेशी दारू आढळून आली. पोलिसांनी सदर ढाब्यावरून गोपीसिंग लक्ष्मणसिंग ठाकूर (४५) याच्या ताब्यातून २४ हजाराची दारू जप्त केली. या प्रकरणी त्याच्या विरुद्ध खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### अल्पवयीन मुलगी एक वर्षाने सापडली

**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील एका गावातून बेपत्ता झालेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला एक वर्षानंतर हरयाणातून सुखरूप परत आणण्यात शेगाव ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. ५ मे २०२४ रोजी सदर मुलगी घरातून निघून गेली होती. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलमानुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या तपासासाठी पथक तयार करून हरयाणातील अंबाला, सेक्टर ९ येथे पाठविण्यात आले. पथकाने दक्षतेने तपास करून बेपत्ता मुलीचा शोध घेतला आणि सुरक्षित तिला वडिलांच्या सुपुर्द करण्यात आले. यावेळी वडिलांनी शेगाव ग्रामीण पोलिसांचे आभार मानले.

# भाव मिळत नसल्याने शेतकऱ्याने उभ्या ज्वारीत फिरविला रोटावेटर

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी):** तालुक्यातील खैरा येथील अनिल मधुकर गणगे या शेतकऱ्याने ९ जून रोजी आपल्या दीड एकर क्षेत्रात पेरणी केलेल्या ज्वारीच्या उभ्या पिकावर रोटावेटर फिरवला. सध्या अवकाळी पाऊस झाल्यामुळे तसेच ज्वारीला योग्य तो भाव मिळत नसल्याने त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलत रोष व्यक्त केला.



मागील खरीप हंगामात अतिवृष्टी सदृश पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची अनेक पिके काढणी अवस्थेत खराब तर झालीच सोबतच उत्पन्नात खूप मोठी घट आल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. थोडीफार पिके हाती आली त्यालाही भावाची किनार अजूनही लाभू शकली नाही. पावसाळ्यात पडलेल्या पावसामुळे यावर्षी विहिरी तुडुंब भरल्याने शेतकऱ्यांनी रब्बी पिकावर दोन पैसे तरी हाती पडावे म्हणून भर देत मका, गहू, हरभरा, ज्वारी ही पिके पेरली होती. त्या पिकांनाही मे च्या अवकाळीने कहर करून हाती तोंडी आलेला घास हिरावला होता. सद्या खरीपाच्या तोंडावर अजूनही काही शेतकऱ्यांच्या शेतात ज्वारीसारखी पिके उभी असून काहींनी बेभाव मजुरीतून ज्वारी पीक घरात आणले आहे. दरम्यान बाजारपेठेत विक्रीसाठी नेल्यानंतर त्यालाही नगण्य भाव मिळत आहे. सद्या ज्वारीला मार्केटमध्ये प्रति क्विंटल १३०० ते १६०० रुपये भाव मिळत असून एकरी १० ते १५ क्विंटलचा उतारा पकडूनही शेतकऱ्यांच्या हाती भोपळा उरत आहे. दुसरीकडे शासनाने ज्वारी पिकाला हमीभाव ३६९९ रुपये प्रती क्विंटलचे भाव जाहीर केले आहेत. मात्र हमीभावाने ज्वारी खरेदीला मुहूर्तच मिळत नसल्याने शेतकऱ्यांना ज्वारी हे पीक बाजारपेठेत कवडीमोल किमतीत विकावे लागत आहे. दरम्यान हवालदील झालेल्या खैरा येथील अनिल मधुकर गणगे या शेतकऱ्याने चक्क आपल्या दिड एकर शेतात उभ्या असलेल्या ज्वारीच्या पिकावर रोटावेटर फिरवले आहे. यासाठी शासनाने शेतकऱ्यांचा तोंडावर आलेला खरीप हंगाम व त्यासाठी लागणाऱ्या तजवीजची गरज लक्षात घेता हमीभावाने खरेदी सुरु करावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

> खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे हातचा गेल्याने दोन पैसे जमा होऊन यावर्षीची पेरणी तरी व्यवस्थित व्हावी यासाठी रब्बी हंगामात दीड एकर क्षेत्रात ज्वारी पीक पेरले होते. सद्या ते काढणीवर आले होते, मात्र बाजारपेठेत या पिकाला कवडीमोल भाव मिळत असल्याने काढणी खर्चही निघण्याची हमी दिसत नसल्यामुळे मी माझ्या शेतात ट्रॅक्टरचलित रोटावेटर फिरवणेच पसंत केले. शासन भावनाशून्य झाले, शेतकऱ्याच्या कोणत्याच पिकाला भाव सद्या नाही. शेतकऱ्यांचा माल घरात आला की भाव पाडले जातात व शेतकऱ्यांचा जेव्हा माल संपतो तेव्हा शासनाची हमीभावाची खरेदी सुरु करून भले केले जाते.
>
> **– अनिल मधुकर गणगे,** शेतकरी खैरा.

## उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांना प्रभु श्रीराम दरबारची चांदीची मूर्ती भेट देवुन सानंदा परिवाराच्या वतीने सत्कार



**खामगाव (महासागर प्रतिनिधी) :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे १२ जून रोजी खामगाव शहराच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या सानंदा निकेतन येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र राज्याचे मदत व पुर्नवसन मंत्री तथा बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक,अमरावती विभागाचे समन्वयक , विधान परिषद सदस्य संजयभाऊ खोडके, विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण,माजी आमदार झिशान सिददीकी, राष्ट्रवादी काँग्रेसचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष अ‍ॅड,नाझेर काझी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ.अलकादेवी सानंदा यांनी ना.अजितदादा पवार यांचे कुकुंम तिलक लावुन औक्षण केले.तसेच यावेळी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा शाल व पुष्पहार घालुन सत्कार केला व क्षत्रिय थाटामध्ये ना.अजितदादांना प्रभु श्रीरामचंद्राची राम दरबारची चांदीची मूर्ती भेट दिली. तसेच यावेळी ना.अजितदादा पवार यांच्यासोबत असलेले बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक यांचा सुध्दा सानंदा परिवाराच्या वतीने प्रभु श्रीरामचंद्राची राम दरबारजी चांदीची मूर्ती भेट देवुन सत्कार करण्यात आला.

## शासकीय तंत्रनिकेतन खामगावच्या २४२ विद्यार्थ्यांना कॅंपस ड्राईव्हद्वारे रोजगाराची संधी

**खामगाव (का.प्र.):** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या कल्पक नेतृत्वाखाली, अमरावती विभागाचे सहसंचालक प्रा. मनोज अंधारे यांच्या मार्गदर्शनात, प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांच्या भरभक्कम पाठींब्यामुळे आणि संस्थेचे आस्थापना व प्रशिक्षण अधिकारी प्रा. रविंद्र प्रांजळे आणि त्यांची चमू यांच्या अथक प्रयत्नातून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात आस्थापना व प्रशिक्षण सेलतर्फ कॅंपस ड्राईव्हची प्रक्रिया ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पद्धतीने राबविण्यात आलेली असुन आजपावेतो २४२ विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

अभियांत्रिकी डिग्री ज्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यांच्यासाठी १० वी नंतर डिप्लोमा हे रोजगार मिळण्याचे उत्कृष्ट माध्यम असल्याचे यातून सिद्ध होते. मिळालेल्या रोजगाराचे पृथःकरण केले असता असे लक्षात येते की, या विद्यार्थ्यांना बजाज ऑटो, टाटा पॉवर, टाटा मोटर्स, जॉन डिअर, धूत ट्रान्समिशन, इंस्टोर इंडिया प्रा. लि., फ्लॅश इलेक्ट्रोनिक्स, सिग्मा ईलेक्ट्रीकल, डायकिन्स प्रा. लि., लुमॅक्स इंडिया प्रा. लि, एंड्रेस अँड हॉसर फ्लोटेक प्रा. लि. या व इतर अनेक नामवंत कंपन्यांत काम करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी पॅकेज आकर्षक असून, काही विद्यार्थ्यांना कमाल ४ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळालेले आहे. विशेष म्हणजे टाटा मोटर्स कंपनीने 'लक्ष्य प्रोग्राम' अंतर्गत निवडलेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी बी. टेक प्रायोजित करण्याची संधी दिली आहे, जी अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. अजुनही काही कंपन्यांचे निकाल यायचे आहेत, आणि त्यामुळे सदर विद्यार्थी संख्या अजून वाढेल असा विश्वास प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांनी व्यक्त केलेला आहे.

संस्थेतील प्रशिक्षण व आस्थापना विभाग, कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत माजी विद्यार्थी, अद्यावत सोईसुविधा, दर्जेदार शिक्षण, उच्चशिक्षित शिक्षक वर्ग व कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणारे प्रामाणिक प्रयत्न, तसेच शैक्षणिक विभाग यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे ही यशस्वी भरती प्रक्रिया पार पडली. यासाठी विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले. या यशाबद्दल संस्था प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांनी आनंद व्यक्त केला असून संस्थेची उज्वल परंपरा यावर्षीदेखील कायम ठेवण्यात यश मिळविल्याबद्दल सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलेले आहे. सदर वृत्त संस्थेचे जनसंपर्क अधिकारी प्रा. राजेश मंत्री यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविलेले आहे.

# अवैध गोवंश खरेदी-विक्री व हत्या प्रकरणी कारवाईची मागणी



**खामगाव (का.प्र.) :** महाराष्ट्र गो सेवा आयोग व बजरंग दल यांच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती व शिवाजी नगर पोस्टे येथे आज १६ जून २५ रोजी निवेदन देण्यात आले. त्यामध्ये नमूद केले आहे की, राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागु करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने गुरांच्या बाजारात होणाऱ्या अवैध गोवंश खरेदी-विक्री बाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. ७ जून २५ रोजी शहरातील मस्तान चौक भागात १२ गोवंश कत्तल करण्याच्या हेतूने बांधलेले आढळून आले. याबाबत शिवाजी नगर पोलिसांना माहिती देण्यात आली असता त्यांनी त्वरीत घटनास्थळी जावून चौकशी केली. तेव्हा १२ गोवंशाची अवैधरित्या खरेदी-विक्री झाल्याचे आढळून आले. या प्रकरणी शिवाजी नगर पोस्टेला तक्रार देण्यात आली असून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच शेतकऱ्यांनी गुरांच्या बाजारात जनावरे विक्रीसाठी आणले असता यासाठी सरपंचाऐवजी ग्रामसेवक, पोलिस पाटील यांचे पत्र ग्राह्य धरण्यात यावे, तशी सूचना शेतकऱ्यांना द्यावी, गोवंशाची अवैध खरेदी- विक्री प्रकरणी कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही निवेदनात दिला आहे. यावेळी महाराष्ट्र गौसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर, विहिंप माजी प्रांत सह मंत्री अमोल अंधारे, जिल्हा मंत्री राजेंद्रसिंह राजपूत, बजरंग दल विभाग

संयोजक गजानन धोरण, जिल्हा संयोजक सुशील कोल्हे, सह संयोजक पवन माळवदे, कोषाध्यक्ष अमोल जोशी, उपाध्यक्ष कृष्णा तायडे, गौरक्षा प्रमुख भारत बावस्कर, नंदू दलाल, शुभम ढगे, अवी बोपले, विशाल इंगळे, ज्ञानू कराळे, सचिन हागे, अविनाश इंगळे, अतुल ठोंबरे आदी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह नांदुरा येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**बुलडाणा,(जिमाका) -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत चालविण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, नांदुरा (जि. बुलढाणा) येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, अपंग, अनाथ इत्यादी घटकांतील विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रियेस पात्रता आहे. नांदुरा नगरपरिषद हद्दीतील शाळा, विद्यालये व महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. प्रवेश अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जातील. इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना https://hmas.mahait.org या अधिकृत वेबसाईटचा वापर करावा. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच अधिक माहितीसाठी संपर्क: ८९७५७७८९४९ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा किंवा वसतिगृहाला प्रत्यक्ष भेट द्यावी, असे आवाहन गृहपाल एस. व्ही. सोनटक्के यांनी केले आहे.

# मराठा पाटील युवक समितीचा उपक्रम कौतकास्पद–ठाणेदार नितीन पाटील

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**शेगाव (महासागर प्रतिनिधी) :** विद्यार्थी दशेत असताना विद्यार्थ्यांच्या गुणांचा गौरव करणे महत्त्वाचे असून त्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल कौतुकाची थाप अतिशय मोलाची ठरते त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना भविष्याची प्रेरणा मिळते त्याकरिता मराठा पाटील समिती च्या वतीने करण्यात आलेला गुण गौरव सोहळा हा अतिशय कौतुकास्पद असल्याच्या गौरव उदगार शहर ठाणेदार नितीन पाटील यांनी या कार्यक्रमात काढले स्थानिक शेगांव शहरात मराठा पाटील युवक समिती कडून दहावी, बारावी मध्ये यश संपादन करणाऱ्या अशा सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. १५ जून रोजी स्थानिक संतनिवृत्ती सभागृह माऊली स्कूल मध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला ,या कार्यक्रमाला मराठा पाटील युवक



समिती चे संस्थापक अध्यक्ष गजाननदादा ढगे होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक ज्ञानेश्वरदादा पाटील होते,या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती मराठा पाटील युवक समिती जिल्हा अध्यक्ष सुनील कुईटे, शेगांव शहर ठाणेदार नितीन पाटील ,ग्रामीण ठाणेदार प्रवीण लिंगाळे आदीची उपस्थिती होती.

## दुचाकीला कट मारल्या प्रकरणी चौघांवर गुन्हा

**शेगाव (महासागर प्रतिनिधी):** अमोल सयाजी चव्हान (वय २७) रा. वाकारीगाव देवळा जि नाशिक हम बाळापूर रोड शेगाव यांनी शहर पोलिसांत तक्रार दिली की, तहसील कार्यालय एमएसईबी चौक शेगाव येथे हजर असतांना आरोपी दत्ता उमाळे व त्याचे सोबत इतर त्याचे तीन मित्रांपैकी एकाने तू आम्हाला कट कां मारला, असे म्हणून चौघांनी शिवीगाळ करुन चापटाबुक्यांनी व दत्ता उमाळे याने तेथील विट हातात उचलून पाठीवर व वरचे ओठांवर मारहान करून लोटपाट केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. अशा तोंडी रिपोर्ट वरून चौघा आरोपींवर कलम ११८(१), ११५ (२), ३५२,३५१ (२), ३(५) भारतीय न्याय संहिते नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनमुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक श्रीकृष्ण तनमुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

